**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर** (अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

**महत्वाची सूचना**

**( सर्व स्टाफ व विद्यार्थ्यांसाठी )**

**No.NB/** 1885 **/२०२५-२६** **दि. ०१.०१.२०२६**

---

ज्युनिअर व सिनिअर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्रशासकीय कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, यु.जी. व पी.जी. इतिहास विभागाच्या वतीने **शनिवार दि.०३.०१.२०२६ रोजी "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती"** निमित्त सकाळी ठीक ९.१५ वाजता प्रतिमापूजनाचा कार्यक्रम ऑफिस समोर आयोजित करणेत आला आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे.

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**
विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

**डॉ. एस. पी. थोरात**
प्र. प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

(स्वायत्त) कोल्हापूर

## इतिहास विभाग

### अहवाल : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त प्रतिमापूजन कार्यक्रम

४/१/२०२६

महाविद्यालयातील यु.जी. व पी.जी. इतिहास विभागामार्फत दिनांक ०३/०१/२०२६ रोजी "क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती" निमित्त प्रतिमापूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम सकाळी ठिक ९.१५ वाजता महाविद्यालयाच्या कार्यालयासमोर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर आपले विचार व्यक्त केले. त्यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेला संघर्ष, समाजातील अज्ञान व अन्यायाविरुद्ध त्यांनी दिलेला लढा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणण्याचे त्यांचे योगदान यावर प्रकाश टाकला. तसेच आजच्या काळात त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन शिक्षणाचे महत्त्व ओळखणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. अनिल जांभळे यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

डॉ. एस. आर. कट्टीमनी

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# सावित्रीबाई फुले जयंती- ३ जानेवारी,२०२६





# विवेकानंद कॉलेजमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये इतिहास विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक व स्वागत इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी केले. याप्रसंगी प्रा. अनिल जांभळे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. आभार डॉ. अवधूत टिपुगडे यांनी मानले. या कार्यक्रमाचे आयोजन इतिहास विभागातील प्राध्यापक, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी ज्युनिअर व सिनिअर कॉलेज प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.